स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड
RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846
# वास्तव
भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित
२१ वर्ष
एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

सच करीब से ही दिखता है...!

● बीड ● रविवार, दिनांक १७ मे २०२६ ● वर्ष २१ वे ● पाने : ४ http://epaper.beedvastav.com Email : beedvatsav@gmail.com ● किंमत ३ रुपये

# डॉ. योगेश क्षीरसागरांचे बालेपिर रस्ता अतिक्रमणावरील स्टेटमेंट म्हणजे भाडेकरूने घरमालकाला घराबाहेर काढण्यासारखे !!

- डॉ. योगेश क्षीरसागर भाजपाचे जबाबदार नेते असून त्यांनी बालेपीर रस्ता अतिक्रमणावर अभ्यास करून बोलले पाहिजे : जाकेर पठाण
- डॉ. आंबेडकर जयंतीत नालीचे पाणी रस्त्यावर सोडले, यावर एक शब्द न बोलणारे डॉ. योगेश क्षीरसागरांना बालेपीर दर्ग्याने अतिक्रमण केल्याचे का वाटू लागले?
- या अतिक्रमणाच्या अनुषंगाने हायकोर्टाने स्थगिती दिली असून येणाऱ्या 8 जुलै 2026 रोजी पुढील सुनावणी ठेवली मग पंधरा दिवसात अतिक्रमण कोण काढणार?

## ज्या रस्त्याचे रुंदीकरण सुरू आहे, तो रस्ताच दर्ग्याच्या जागेत, मग अतिक्रमण कोणाचे?

**बीड : प्रतिनिधी**
2023 पासून सदरील अतिक्रमणबाबत वाद सुरू आहे. विशेष म्हणजे पुरातत्त्व विभाग आणि 'वक्फ'मध्ये या अनुषंगाने रीतसर तक्रार आणि नोंद आहे. एवढेच नव्हे तर सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट देखील आहे. मात्र भाजपाचे नेते डॉ. योगेश क्षीरसागर म्हणतात मागील एक वर्षापासून हा वाद सुरू आहे. एवढेच नव्हे तर ते पुढे असेही म्हणतात की, येणाऱ्या पंधरा दिवसांमध्ये सदरील अतिक्रमण काढण्यात येणार असल्याचे संबंधित विभागाने त्यांना सांगितले आहे. पण डॉ. योगेश क्षीरसागर साहेब, सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट असताना आणि याबाबत कोर्टाने स्थगिती दिलेली असताना हे अतिक्रमण पंधरा दिवसांमध्ये कोण आणि कसे काढणार? ज्या दर्ग्याने रस्त्यावर अतिक्रमण केले असे तुम्हाला वाटते, तो रस्ताच मुळात त्या दर्ग्याच्या जागेत आहे, याची सखोल माहिती तुम्ही घेणे गरजेचे आहे आणि या अनुषंगाने अभ्यास पूर्ण वक्तव्य तुम्ही केले पाहिजे अशी आमची रास्त अपेक्षा आहे. एकूणच या प्रकरणाच्या अनुषंगाने जे स्टेटमेंट डॉ. योगेश क्षीरसागर यांनी माध्यमांना दिले आहे, त्याचा सरळ सरळ अर्थ असा आहे की, भाडेकरूनेच घर मालकाला घराबाहेर काढण्यासारखे आहे, अशी खरमरीत प्रतिक्रिया तक्रारदार जाकेर खान पठाण यांनी दैनिक 'वास्तव'शी बोलताना व्यक्त केली आहे.



### पुरातत्व खात्याची मालमत्ता असताना अशुरखाण्यावर बुलडोझर कोण चढविणार?

● बीड शहरातील नगर रोड येथील बालेपिर दर्गा येथे अशुरखाना आहे. हा अशुरखाना पुरातत्व विभागाची मालमत्ता असल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. तसेच याठिकाणी असलेली बालेपीर दर्गा ही वक्फ बोर्डाची मालमत्ता आहे. म्हणजेच जो महामार्ग बालेपीर दर्ग्यापासून गेला आहे ती जागाच मुळात दर्ग्याची आहे. दरम्यान या अतिक्रमणाच्या अनुषंगाने 2023 मध्ये हायकोर्टामध्ये याचिका दाखल केली होती. या याचिकेच्या अनुषंगाने हायकोर्टाने स्थगिती दिली असून येणाऱ्या 8 जुलै 2026 रोजी याची पुढील सुनावणी आहे, असे असताना अशुरखाना आणि दर्ग्यावर कोण बुलडोझर चढविणार? असा सवाल जाकेर खान पठाण यांनी उपस्थित केला असून पुढे ते म्हणाले, डॉ योगेश क्षीरसागर अतिक्रमण काढण्याची भाषा करीत असतील तर त्यांना याबाबत सखोल अभ्यास करण्याची नितांत गरज आहे, असे मत तक्रारदार जाकेर खान पठाण यांनी व्यक्त केले आहे.

### डॉ. योगेश क्षीरसागर साहेब ! भाडेकरूने घरमालकाला घराबाहेर काढले तर चालेल का?

● ज्यांच्या जागेतून हा महामार्ग गेला आहे ती जागाच मुळात बालेपिर दर्गा यांची असून तशी स्पष्ट नोंद वक्फ बोर्डात असताना मालकानेच अतिक्रमण केल्याची बोंब भाडेकरू ठोकत असतील तर त्यावर डॉ. योगेश क्षीरसागर विश्वास ठेवणार का? तेव्हा डॉ योगेश क्षीरसागर यांनी जे स्टेटमेंट केले आहे ते अभ्यासपूर्ण नाही, असे स्पष्ट मत तक्रारदार जाकेर खान पठाण यांनी व्यक्त केले आहे. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील जी छोटी दर्गा आहे, ती दर्गा तमाम बिडकरांचे श्रद्धास्थान आहे. ही एकमेव अशी दर्गा आहे की, जिथे दैनंदिनी हजारो लोक वाकून सलाम केल्याशिवाय पुढे जात नाहीत, हे वास्तव आहे. या दर्ग्यापासून कोणालाही अडचण नाही किंवा कोणाचीही याबाबत तक्रार नाही, तरीही ही किमान दिडशे ते दोनशे वर्षांपासूनची दर्गा अतिक्रमणात असल्याचे सांगितले जात आहे. एकूणच ज्या जागा दर्ग्यांच्या आहेत त्याच ठिकाणी या दर्गा आता दुर्दैवाने अतिक्रमणात वाटू लागल्या आहेत याचेच मोठे आश्चर्य वाटते, असेही मत तक्रारदार जाकेर खान पठाण यांनी व्यक्त केले.





### बकरीदच्या सणात डॉ. क्षीरसागरांनी मुस्लिम समाजाचे टाळकी भडकवू नयेत!!

● भाजप नेते डॉ. योगेश क्षीरसागर यांनी बालेपिर महामार्ग अतिक्रमाच्या अनुषंगाने अभ्यासपूर्ण स्टेटमेंट करावेत जेणेकरून जवळच आलेल्या बकरीद या सनासुदीच्या काळामध्ये मुस्लिम समाजाचे टाळके भडकणार नाहीत याची त्यांनी दक्षता घ्यायला पाहिजे. स्टेटमेंट करण्यापूर्वी त्यांनी या अनुषंगाने संपूर्ण माहिती घेऊन यावर बोलले पाहिजे. तसेच माध्यमांसमोर बोलताना समाजा समाजामध्ये तेढ निर्माण होऊ नये, याचाही सखोल विचार त्यांनी केला पाहिजे. कारण बालेपिर ही दर्गा तमाम मुस्लिमांचे श्रद्धास्थान, अस्मिता आणि जिव्हाळ्याचा मुद्दा आहे. एकूणच हा अत्यंत नाजूक प्रश्न असून यामध्ये कोणीही स्टेटमेंट करताना विचारपूर्वक करावे अशी आमची अपेक्षा आहे, अशी प्रतिक्रिया तक्रारदार जाकेर खान पठाण यांनी व्यक्त केली.

## जायकवाडीचा पाणीप्रश्न पुन्हा पेटला; शेतकऱ्यांनी घेतली जिल्हाधिकाऱ्यांची भेट, आंदोलनाची दिली हाक

**बीड / प्रतिनिधी :**
बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या पाचविला पुंजलेला दुष्काळ दूर करण्यासाठी व शेतशिवार हिरवेगार करण्यासाठी शेतीला जायकवाडी धरणाचे पाणी मिळणे गरजेचे आहे. गेल्या अनेक वर्षांपासून ही मागणी धगधगत आहे. यासाठी लोकलढा आंदोलनातील शेतकर्यांनी जिल्हाधिकारी यांची भेट घेत आंदोलनाची हाक दिली. त्यामुळे जायकवाडी धरणाचा पाणीप्रश्न पुन्हा एकदा पेटला आहे.




श्री क्षेत्र भगवान गड ते मादळमोही, माजलगाव तालुक्यातील तालखेड, नाथापूर पर्यंतच्या जवळपास शंभर किलो मीटर अंतरातील शेतीला जायकवाडी धरण व कृष्णा खोर्याचे पाणी मिळत नाही. त्यामुळे शिरूर, बीड, गेवराई, वडवणी व माजलगाव तालुक्यातील शेतकर्यांना सातत्याने दुष्काळाला सामोरे जावे लागते. शेतीला बारमाही पाणी मिळत नसल्याने शेतकरी आत्महत्या, शेतकरी कर्जबाजारीपणा, तरुणांचे स्थलांतर, ऊसतोड मजूर, बेकारी, आरोग्य असे अनेक प्रश्न आहेत. हे प्रश्न सोडविण्यासाठी बीड जिल्ह्यातील शेतीला जायकवाडी धरण व कृष्णा खोर्याचे पाणी मिळाले पाहिजे. यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने मागणी व आंदोलने होत आहेत. मात्र शासन या योजनांना एक रुपयाही निधी देत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप आहे. यासाठी शुक्रवारी लोकलढा आंदोलनाचे ● पान ४ वर...

## तीर्थ क्षेत्र पुरुषोत्तम पुरी चा 'दैनिक वास्तव' विशेषांक सप्रेम भेट



माजलगाव : तालुक्यातील तीर्थ क्षेत्र असलेल्या पुरुषोत्तम पुरी येथील अधिकमास निमित्ताने भगवान पुरुषोत्तम यात्रेला प्रारंभ झाला आहे. या वर 'दैनिक वास्तव' ने विशेष लेख लिहून प्रसिद्ध केला आहे. या विशेष वृत्ताचे विशेष पान मोठ्या साईज मध्ये इन्लार्ज करून ट्रस्ट चे अध्यक्ष विजय गोळेकर, सचिव बाबासाहेब गोळेकर, उपाध्यक्ष दिगंबर कोरडे, सरपंच भाऊसाहेब गोळेकर यांना देताना दैनिक वास्तव चे निवासी संपादक अरविंद ओव्हाळ, गौतम डोंगरे, भगवानराव पौळ, लक्षीमान फुलवरे आदी उपस्थित होते.

यावेळी 'दैनिक वास्तव' टीमचे मान्यवरांनी कौतुक केले. पर्यटनाला चालना देणारे, लोकांच्या हाताला रोजगार मिळवून देणारे कार्य माजलगाव येथे घडत असून केवळ विरोधाला विरोध म्हणून नकारात्मक



बातम्या देण्यापेक्षा सकारात्मचेती कास धरून दैनिक वास्तव ने सत्य आहे तेच सर्वांसमोर मांडले.

आज पुरूषोत्तमपुरी येथे भव्य मंदिर उभे रहात आहे. संपूर्ण देश, महाराष्ट्र या निमित्ताने माजलगाव शहरात येत असून सामान्य जनतेने भक्तांच्या स्वागताला तयार राहिले पाहिजे असे एकंदरीत चित्र उभे करण्यात दैनिक वास्तवला यश आले आहे.

**डॉ.गणेश ढवळे यांचा संताप** ➤ नगरपालिकेच्या दुटप्पीपणा निषेधार्ह

## धनदांडग्यांना, पुढा-यांना पायघड्या गोरगरिबांना कायद्याचा दंडुका







**बीड / प्रतिनिधी :**
बीड शहरातील बसस्थानक, जिल्हा रुग्णालय परिसरातील रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या टपऱ्या, फेरीवाले व लघुउद्योजकांच्या दुकानांवर अतिक्रमण हटाव मोहिमेच्या नावाखाली कारवाई करत नगरपालिकेने कायद्याचा धाक दाखवला. मात्र दुसरीकडे शहरातील मोठमोठ्या अतिक्रमणांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे. नगरपालिकेने गोरगरीबांच्या उपजीविकेवर हातोडा चालवत स्वत:ची पाठ थोपटून घेतली असली, तरी बिंदुसरा व करपरा नदीपात्रातील अतिक्रमित बांधकामे, मोठमोठे मंगल कार्यालये, हॉटेल्स आणि भू-माफियांनी केलेल्या नियमबाह्य बांधकामांवर मात्र कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

शहरातील अनेक भागांमध्ये नियमांचे उल्लंघन करून उभारण्यात आलेल्या अतिक्रमणांविरोधात सामाजिक संघटना व कार्यकर्त्यांनी वारंवार आंदोलने आणि निवेदने दिली आहेत. मात्र नगरपरिषद आणि जिल्हा प्रशासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगत आहे. आर्थिक साटेलोटे आणि राजकीय दबावामुळेच मोठ्या अतिक्रमणधारकांना अभय दिले जात असल्याचा आरोपही होत आहे.

"कायदा सर्वांसाठी समान असावा. गोरगरीबांवर कारवाई आणि धनदांडग्यांना पायघड्या हा प्रकार थांबला पाहिजे. अतिक्रमण हटाव मोहिमेत दुजाभाव न करता सर्वांवर समान निकष लावले गेले पाहिजेत," अशी मागणी डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

# आजचे राशि भविष्य

## मेष रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्‌भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

## वृषभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## मिथुन रास

➤ या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्‌भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

## कर्क रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## सिंह रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कन्या रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

## तूळ रास

➤ आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

## वृश्चिक रास

➤ आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

## धनु रास

➤ आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वत:च्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## मकर रास

➤ या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कुंभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

## मीन रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल.

# केंद्र सरकारच्या मान्यतेने 'खो-खो फेडरेशन ऑफ इंडिया' अधिकृत; अनधिकृत खो-खो संघटनांना जबरदस्त दणका

➤ **गेवराई : प्रतिनिधी**

'खो-खो फेडरेशन ऑफ इंडिया' ही भारतातील मान्यताप्राप्त, अधिकृत व भारत सरकारच्या युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाकडे वर्षोनुवर्ष नोंदणीकृत असलेली क्रीडा संस्था आहे. पण काही अनधिकृत व नियमबाह्य कार्य करणाऱ्या व खेळाडूंचे नुकसान करणाऱ्या व्यक्तींकडून मूळ खो-खो संघटना अनधिकृत असल्याचा अपप्रचार केला जात होता व त्याला ही मोठी चपराक असल्याचे महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव यांनी व्यक्त केलीआहे.

भारतीय खो-खो क्षेत्रात गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेल्या अधिकृततेच्या संघर्षावर अखेर केंद्र सरकारने निर्णायक शिक्कामोर्तब केले असून, 'खो-खो फेडरेशन ऑफ इंडिया' (केकेएफआय) हिच देशातील अधिकृत राष्ट्रीय खो-खो संघटना असल्याचे स्पष्ट झाले आहे. युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाने २०२६ वर्षासाठी केकेएफआयला



अधिकृत मान्यता बहाल करताच देशभरातील अनधिकृत संघटनांचे धाबे दणाणले आहेत. या निर्णयामुळे महाराष्ट्रासह संपूर्ण भारतातील खो-खो क्षेत्रात मोठी खळबळ उडाली असून आता पारंपारिक महाराष्ट्र खो-खो असोसिएशन हीच राज्यातील अधिकृत संस्था असल्याचेही अधोरेखित झाले आहे.

### केंद्र सरकारचा अधिकृत निर्णय

भारत सरकारच्या युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाने जारी केलेल्या अधिकृत पत्रानुसार, 'खो-खो फेडरेशन ऑफ इंडिया' यांनी केलेल्या अर्जाला सक्षम प्राधिकाऱ्यांनी मंजुरी देत २०२६ वर्षासाठी वार्षिक मान्यतेचे नूतनीकरण केले आहे. मंत्रालयाच्या या निर्णयामुळे केकेएफआय आणि त्यांच्याशी संलग्न असलेल्या राज्य संघटनांनाच अधिकृत मान्यता प्राप्त झाली आहे.

### ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत मान्यता वैध

क्रीडा मंत्रालयाच्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे, ही मान्यता ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत वैध राहणार आहे. तसेच ही मान्यता दरवर्षी नूतनीकरण करून घ्यावी लागते. त्याप्रमाणे या वर्षी सुध्दा ही मान्यता खो-खो फेडरेशन ऑफ इंडियाला मिळाली आहे. तसेच न्यायालयात सुरू असलेल्या प्रकरणांच्या अंतिम निकालाच्या अधीन राहून ही मान्यता लागू असेल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे केकेएफआयची अधिकृतता अबाधित असल्याचे निश्चित झाले आहे.

### अनधिकृत संघटनांना मोठा झटका

गेल्या काही काळात महाराष्ट्रासह देशभरात काही अनधिकृत खो-खो संघटना सक्रिय झाल्या होत्या. या संघटनांकडून स्वत:ला अधिकृत दर्शवत केकेएफआय आणि संलग्न संघटनांबाबत संभ्रम निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू होते. मात्र, केंद्र सरकारच्या या अधिकृत पत्रामुळे अशा दिशाभूल करणाऱ्या संघटनांना मोठा धक्का बसला आहे. खो-खो क्षेत्रातील अनेक खेळाडू, प्रशिक्षक आणि पदाधिकाऱ्यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे.

### खेळाडूंना मिळणार मोठा दिलासा

या पत्राची प्रत भारतीय क्रीडा प्राधिकरण (साई), रेल्वे बोर्ड आणि इतर संबंधित विभागांनाही पाठवण्यात आली आहे. त्यामुळे अधिकृत स्पर्धांचे आयोजन, खेळाडूंना मिळणाऱ्या सवलती, शासकीय मान्यता, नोकरीतील लाभ आणि राष्ट्रीय स्तरावरील संधी याबाबतचा संभ्रम दूर होणार आहे. अधिकृत संघटनांमार्फत खेळणाऱ्या खेळाडूंना आता अधिक सुरक्षित आणि पारदर्शक वातावरण मिळणार आहे.

### महाराष्ट्र खो-खो असोसिएशनलाच अधिकृत मान्यता

केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे महाराष्ट्रात महाराष्ट्र खो-खो असोसिएशन हीच अधिकृत राज्य संघटना असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले आहे. त्यामुळे राज्यातील जिल्हा संघटना, खेळाडू, प्रशिक्षक आणि आयोजकांनी अधिकृत संघटनेच्या माध्यमातूनच कामकाज करण्याचे आवाहन महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव यांनी केले आहे. यापुढे अनधिकृत खो-खो संघटनेत काम करणाऱ्या प्रशिक्षक / कार्यकर्त्यांवर कडक कारवाई करणार असल्याचे जाहीर केले आहे.

### खो-खो क्षेत्रात पारदर्शकतेची नवी सुरुवात

या ऐतिहासिक निर्णयामुळे भारतीय खो-खो क्षेत्रात पारदर्शकता, शिस्त आणि अधिकृततेचा नवा अध्याय सुरू झाला आहे. खऱ्या खेळाडूंना न्याय मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून, भविष्यातील राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठीही अधिकृत संघटनांचे महत्त्व अधिक बळकट झाले आहे. केंद्र सरकारच्या या भूमिकेमुळे खो-खो खेळाला संघटनात्मक स्थैर्य मिळाल्याची भावना खो-खो फेडरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष सुधांशू मित्तल, सरचिटणीस उपकार सिंह व खजिनदार गोविंद शर्मा, राज्य खो खो संघटनेचे प्रसिद्धी समिती सदस्य प्रा राजेंद्र बरकसे यांनी स्पष्ट केले आहे.

# नरेंद्र ते नंदाबाई : संघर्ष, अश्रू आणि माणुसकीचा प्रवास

## विशेष



**अन्वर शेख**
प्राचार्य, सिंदफणा पब्लिक स्कूल, माजलगाव मो. ९८८१०४५२०९

– बीडला काही कामानिमित्त गेलो होतो. दिवसभराची धावपळ संपवून परतीचा प्रवास सुरू झाला होता. संध्याकाळ अलगद पृथ्वीच्या कुशीत उतरू लागली होती. मावळत्या सूर्याने आकाशात केशरी रंगांची उधळण केली होती आणि महामार्गावरून धावणाऱ्या वाहनांच्या प्रकाशात थकव्याची एक शांत सावली पसरली होती.

मी सहज आमचे चालक अमोल काटे यांना म्हटलं, "चल, कुठेतरी थांबून चहा घेऊया." अमोलने गाडी छत्रपती सहकारी साखर कारखान्याजवळील एका छोट्याशा हॉटेलसमोर उभी केली. साधंसं हॉटेल लोखंडी खुर्च्या चुलीवर उकळणारा चहा आणि महामार्गाच्या धुळीत जगणारी काही शांत माणसं. पण त्या साध्या जागेत मला आयुष्याचा एक विलक्षण धडा मिळणार आहे, याची कल्पनाही नव्हती.

आम्ही एका टेबलावर बसलो. चहाची ऑर्डर दिली. तेवढ्यात माझं लक्ष बाजूच्या टेबलाकडे गेलं. तिथे एक तृतीयपंथी ताई शांतपणे बसल्या होत्या. त्यांच्या चेहऱ्यावर एक विलक्षण तेज होतं—जणू आयुष्याने हजारो जखमा दिल्या होत्या, पण त्या जखमांवर त्यांनी माणुसकीची फुलं उमलवली होती. त्या कोणाकडे काही मागत नव्हत्या, कोणाशी वाद घालत नव्हत्या; फक्त शांतपणे बसल्या होत्या. त्यांच्या डोळ्यांत वेदना, संघर्ष आणि समाधानाचा खोल समुद्र दडलेला होता.



मनात अचानक विचार आला—"यांच्याशी बोलायला हवं." हॉटेल मालकाशी अमोलची ओळख होती. त्याने त्यांना आमच्या टेबलाजवळ बोलावलं. त्या हळूहळू चालत आमच्यासमोर येऊन बसल्या. त्यांच्या चालण्यात थकवा होता, पण स्वाभिमान तितकाच ठाम होता.

मी नम्रपणे माझी ओळख करून दिली. "मी एका शाळेचा प्राचार्य आहे. मला तुमच्याशी थोडं बोलायचं आहे," असं म्हणताच त्या हलकंसं हसल्या. ते हसू वेगळंच होतं—जणू आयुष्याने हजार वेळा रडवल्यानंतरही ओठांवर टिकून राहिलेली आशेची एक रेघ.

मी त्यांना नाव विचारलं. त्या म्हणाल्या, "माझं नाव नंदाबाई." काही क्षण त्या शांत राहिल्या आणि मग हळू आवाजात म्हणाल्या, "पण आधी माझं नाव नरेंद्र होतं."

त्या एका वाक्यात त्यांच्या संपूर्ण आयुष्याचा संघर्ष सामावलेला होता. जन्माने नरेंद्र पण मनाने नंदाबाई. समाजाने ज्यांना समजून घेतलं नाही, त्या आत्म्याने स्वत:चं अस्तित्व स्वत: घडवलं होतं.

त्यांच्याशी संवाद साधताना लक्षात आलं की त्यांना औपचारिक शिक्षण नसतानाही त्यांची मराठी अत्यंत शुद्ध होती. प्रत्येक शब्दात अनुभवाचं शहाणपण होतं. त्यांचं मूळ गाव कन्नडजवळचं. बालपणाबद्दल विचारलं असता त्यांच्या चेहऱ्यावर वेदनादायक स्मित उमटलं.

त्या म्हणाल्या, "लहानपणी लोक मला 'झक्का' म्हणून चिडवायचे. गावात फिरताना लोक हसायचे, बोट दाखवायचे."

हे सांगताना त्यांच्या डोळ्यांतल्या जुन्या जखमा पुन्हा ओलावल्या. पण पुढच्याच क्षणी त्या म्हणाल्या, "माझे वडील मात्र कायम माझ्या पाठीशी उभे राहिले. लोक काहीही बोलले तरी त्यांनी मला कधी टाकून दिलं नाही."

त्या क्षणी जाणवलं—एका मुलाला संपूर्ण समाजाची गरज नसते; कधी कधी एका व्यक्तीचा आधारही त्याला जगण्याची ताकद देतो.

मी त्यांना विचारलं, "तुम्ही इथे काय करता?"

त्या शांतपणे म्हणाल्या, "मी काही मागत नाही साहेब मी फक्त उभी राहते."

त्या छत्रपती सहकारी साखर कारखान्यासमोरील स्पीड ब्रेकरजवळ उभ्या राहतात. स्पीड ब्रेकरमुळे वाहनं थांबतात. काही लोक त्यांच्या हातात पैसे ठेवतात, काही फक्त हसून पुढे जातात. त्या म्हणाल्या,

"जो दे उसका भी भला जो ना दे उसका भी भला."

त्या एका वाक्यात इतकं समाधान होतं की जाणवलं—काही लोकांकडे पैसा कमी असतो, पण मन मात्र आकाशाएवढं मोठं असतं. पण खरी कहाणी अजून बाकी होती. बोलता बोलता त्यांनी सांगितलं की त्यांच्या भावाचं निधन झालं. त्यांच्या मागे चार लहान मुलं होती. घरात आधार नव्हता. मी विचारलं, "मग त्या मुलांचं काय?" त्यावर नंदाबाईंचा आवाज भरून आला. त्या म्हणाल्या, "मी त्यांची आई झाले."

त्या क्षणी त्यांच्या डोळ्यांत मला ममता दिसली—रक्ताच्या नात्यांनाही लाजवेल अशी. आज त्या स्वत: त्या चार मुलांच्या शिक्षणाचा खर्च करत आहेत. दोन मुली B.Sc. Nursing शिकत आहेत, एक मुलगा BCA करत आहे आणि दुसरा Graphic Designing शिकत आहे. रस्त्यावर उभं राहून लोकांनी दिलेल्या पैशातून त्या चार मुलांचं भविष्य घडवत आहेत. समाजाने ज्यांना "अपूर्ण" म्हटलं, ती व्यक्ती इतरांचं आयुष्य पूर्ण करत होती.

इतकंच नाही, तर कोरोनाच्या काळात त्यांची एक जवळची मैत्रीण वारली. तिच्या मुलांचं शिक्षण अर्धवट राहू नये म्हणून आज त्या त्यांच्याही पाठीशी उभ्या आहेत. स्वत:चं आयुष्य काट्यांवर चालत गेलं, पण दुसऱ्यांसाठी त्यांनी फुलांची वाट निर्माण केली.

त्यांची कहाणी ऐकताना सतत वाटत होतं—काही माणसं देवळात नसतात; ती रस्त्याच्या कडेलाही भेटतात. तृतीयपंथीयांबद्दल समाजात अनेक गैरसमज आहेत. काहींच्या वागण्यामुळे संपूर्ण समाजाकडे चुकीच्या नजरेने पाहिलं जातं. मी त्यांना विचारलं, "लोक तृतीयपंथीयांबद्दल वाईट बोलतात जबरदस्तीने पैसे घेतात असं म्हणतात" त्यावर त्या फक्त हलकंसं हसल्या. त्या हसण्यात राग नव्हता, फक्त आयुष्य समजून घेतल्याचं शांत दु:ख होतं.

त्या म्हणाल्या, "सगळे सारखे नसतात साहेब आमच्यातही माणुसकी असते."

त्या एका वाक्याने मन सुन्न झालं. कारण खरंच आपण माणसांना त्यांच्या कपड्यांवरून, आवाजावरून, ओळखीवरून मोजतो. पण माणुसकीची उंची मोजण्यासाठी कोणतंही माप नसतं.

चहा कधी संपला, वेळ कधी निघून गेला कळलंच नाही. आम्ही तिथून निघालो. गाडी पुढे जात होती, पण मन मात्र तिथेच थांबलं होतं—त्या स्पीड ब्रेकरजवळ जिथे गाड्या थांबतात आणि एक मोठं हृदय शांतपणे उभं राहतं. त्या दिवशी मला एक तृतीयपंथी व्यक्ती भेटली नाही त्या दिवशी मला माणुसकी भेटली.

समाजाने ज्यांना आयुष्यभर रस्त्याच्या कडेला उभं केलं, ती व्यक्ती आज अनेकांच्या आयुष्याचा आधार बनून उभी आहे. नंदाबाईंना भेटल्यानंतर मात्र एक प्रश्न आजही मनात कायम आहे—

खरंच अपूर्ण कोण आहे?

नंदाबाई

की त्यांना समजून न घेणारा समाज?

# गोठ्यातून दोन म्हशी चोरीचा प्रयत्न उधळला

## ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे दोन आरोपी जेरबंद; दोन जण फरार

माजलगाव / प्रतिनिधी :

माजलगाव तालुक्यातील सादोळा शिवारात गोठ्यात बांधलेल्या दोन म्हशी चोरी करून पिकअप वाहनातून पळवून नेण्याचा प्रयत्न ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे हाणून पाडण्यात आला. या प्रकरणी दोन आरोपींना पकडण्यात पोलिसांना यश आले असून अन्य दोन आरोपी अंधाराचा फायदा घेत पसार झाले आहेत. ही घटना दि. १५ मे रोजी रात्री घडली. याबाबत प्रणव प्रल्हाद गायकवाड (वय २०, रा. सादोळा, ता. माजलगाव) यांनी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

फिर्यादीच्या माहितीनुसार, त्यांच्या वडिलांच्या मालकीची गट क्रमांक ३८६ मधील १८ एकर शेती असून शेतातील गोठ्यात दोन गाई व दोन म्हशी बांधलेल्या होत्या. दि. १५ मे रोजी रात्री साडेसातच्या सुमारास त्यांचे वडील दूध घेऊन घरी गेले होते. जेवणानंतर रात्री साडेआठ वाजता ते पुन्हा शेतात आले असता गोठ्यात फक्त दोन गाई दिसून आल्या, तर दोन म्हशी गायब असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर गावातील व परिसरातील शेतकऱ्यांना संपर्क करून शोधमोहीम सुरू करण्यात आली.



दरम्यान, बद्रीनाथ गायके यांनी गायकवाड कुटुंबीयांना माहिती दिली की, त्यांच्या शेताजवळील रस्त्यावरून जाणाऱ्या राखाडी रंगाच्या पिकअप वाहनातून एक म्हैस खाली पडलेली दिसली. वाहन चालक संशयास्पद वाटल्याने त्यांनी तत्काळ मोटारसायकलवरून त्या वाहनाचा पाठलाग सुरू केला. किट्टीआडगाव येथे ग्रामस्थांनी संबंधित पिकअप अडवून संशयितांची चौकशी सुरू केली.

घटनेची माहिती मिळताच प्रणव गायकवाड व त्यांचे चुलते राहुल गायकवाड घटनास्थळी पोहोचले. तेथे ग्रामस्थ पिकअप चालकासह तिघा संशयितांना पकडून चौकशी करत होते. मात्र, गर्दीचा फायदा घेत दोन आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. उर्वरित दोघांकडून समाधानकारक उत्तरे मिळत नसल्याने संतप्त ग्रामस्थांनी त्यांना चोप दिला.

यानंतर घटनास्थळी दाखल झालेल्या पोलिसांनी दोघांना ताब्यात घेऊन उपचारासाठी सरकारी रुग्णालयात दाखल केले. पोलिस चौकशीत पकडलेल्या आरोपींनी आपली नावे गणेश शिवाजी धरपडे (रा. सादोळा, ह.मु. पुणे) व शहाबाज शाकेर खान (रा. पुणे) अशी सांगितली. आरोपींकडून एमएच-१४ एमएच-४२९५ क्रमांकाचे पिकअप वाहन जप्त करण्यात आले आहे. चोरीस गेलेल्या अंदाजे एक लाख रुपये किंमतीच्या दोन काळ्या म्हशींपैकी एक म्हैस वाहनातून खाली पडून जखमी झाली, तर दुसरी म्हैस पिकअप वाहनात आढळून आली.

या प्रकरणी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून फरार आरोपींचा शोध सुरू आहे. ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे मोठी जनावर चोरी उघडकीस आल्याने परिसरात या घटनेची जोरदार चर्चा सुरू आहे.

**महत्वाचे ठळक मुद्दे**

- सादोळा शिवारातील गोठ्यातून दोन म्हशी चोरी
- ग्रामस्थांनी संशयित पिकअपचा पाठलाग करून पकडले
- दोन आरोपी पोलिसांच्या ताब्यात, दोघे फरार
- एक म्हैस वाहनातून पडून जखमी, दुसरी पिकअपमध्ये सापडली
- माजलगाव ग्रामीण पोलिसांत गुन्हा दाखल

# स्वस्त धान्य दुकानदारांच्या मनमानीमुळे, लाभार्थ्यांची झोळी रिकामी

➤ **सोनपेठ :** सोनपेठ तालुक्यातील डिघोळ येथील स्वस्त धान्य दुकानदाराच्या मनमानी कारभार सुरू असल्याने कार्डधारक नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. सोनपेठ तालुक्यातील हे गाव लोकसंख्येने मोठे आहे तरी या गावातील अठरापगड जातीचे लोक राहत आहेत. परंतु पुरवठा विभागाचे स्वस्त धान्य दुकानावर नियंत्रण नसल्यामुळे त्याचा मनमानी कारभार सुरू असल्याचे दिसत आहे. दुकानासमोर दर्शनी फलक लावलेले आहे परंतु या टायमाद्वारे दुकान उघडले किंवा बंद केले जात नाही त्यामुळे नागरिक स्वस्त धान्य घेण्यापासून वंचित राहत आहेत. मग हे दुकानासमोर लावलेले फलक नुसते दिसायलाच आहे की काय अशी नागरिकांमध्ये चर्चा होताना दिसत आहे. तसेच स्वस्त धान्य उपलब्ध झाल्यानंतर संबंधित दुकानदाराने त्याबाबत गावात मुनादी देऊन नागरिकांना सुचित करणे आवश्यक असताना तसे केले जात नाही. त्यामुळे स्वस्त धान्य दुकानातील माल केव्हा आला व कुठे गेला हे समजत नाही काही दुकानासमोर कार्डधारक सकाळपासून रांगा लावून बसतात 1 वाजेपर्यंत ते उन्हात ताडकळत असतात पण दुकानदार न आल्याने बऱ्याचदा त्यांना रिकाम्या हाताने परतावे लागते. तर एखाद्या ग्रामस्थांनी स्वस्त धान्य दुकानदारांना आपल्या भ्रमणध्वनीद्वारे फोन केला असता तर त्याचा फोन कधी स्वीच ऑफ सांगतो तर कधी उचलल्या जात नाही. त्यामुळे नागरिकांना पाच पाच सहा सहा दिवस दुकानाला हेलपाटे मारावे लागतात तर ही होणारी नागरिकांची गैरसोय कधी संपणार हेच नागरिकांना प्रश्न पडला आहे.



### दुकान-फोन सतत बंद असते!

चार-पाच महिन्याचे मला धान्य मिळालेले नाही हे दुकान सतत बंद असते कधी फोन केला तर त्याचा फोन स्विच ऑफ असतो मला प्रत्येक वेळेस कमीत कमी धान्य दिले जाते आणि म्हणतो पुढच्या वेळेस पूर्ण देतो.

● **किरण गायकवाड**, ग्रामस्थ

सांजदैनिक बीड वास्तव

सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक - जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक - अरविंद ओव्हाळ** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद-विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

## विशेष



## एनएसएल शुगर कारखान्यात कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य शिबिर उत्साहात संपन्न

**फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडियाच्या सहकार्याने तपासणी व जनजागृती**

**महत्वाचे ठळक मुद्दे**

● एनएसएल शुगर येथे आरोग्य शिबिराचे आयोजन ● कर्मचाऱ्यांची वैद्यकीय तपासणी व रक्त चाचण्या ● आरोग्य जनजागृतीसह समुपदेशन कार्यक्रम ● फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडियाचे मार्गदर्शन ● कारखाना प्रशासन व कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**माजलगाव / प्रतिनिधी :** तालुक्यातील मोजे पवारवाडी येथील एनएसएल शुगर कारखान्यात दिनांक ११ मे २०२६ रोजी कारखाना कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कर्मचाऱ्यांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमाचे उद्घाटन तेजो व्हाईस प्रेसिडेंट (ऑपरेशन) यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. टेले, शाखाधिकारी सुगत रत्न गायकवाड, पाटील मॅडम तसेच जिया शेख यांची प्रमुख उपस्थिती होती. कारखान्याचे एमडी श्री मूर्ती साहेब, एचआर विभागाचे श्री देव बाप्पा साहेब, केन अधिकारी जयस्वाल साहेब तसेच आहेरकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर पार पडले. या शिबिरात वैद्यकीय अधिकारी डॉ. गणेश खुरपे यांनी कारखान्यातील कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी केली. तसेच गंगामसला येथील आरोग्य कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून समुपदेशन व रक्त चाचण्यांचे काम केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी एल. डब्ल्यू. एस. पाटील साहेब, चौरे मॅडम यांनी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमाच्या शेवटी शेख शहाबुद्दीन यांनी उपस्थितांचे आभार मानले. आरोग्य शिबिरामुळे कर्मचाऱ्यांना प्राथमिक आरोग्य तपासणीसह आरोग्यविषयक मार्गदर्शन मिळाल्याने समाधान व्यक्त करण्यात आले.




# अधिक मास यात्रेला आजपासून प्रारंभ; पार्किंगचा वाद अखेर मिटला

➤ रांगेतून दोन तासांत तर व्हीआयपी पासधारकांना १५ मिनिटांत पुरुषोत्तमाचे दर्शन ➤ सीसीटीव्ही आणि कडक पोलिस बंदोबस्तात भाविकांसाठी प्रशासन सज्ज





**➤ अरविंद ओव्हाळ : प्रतिनिधी**

देशातील एकमेव भगवान पुरुषोत्तम मंदिर असलेल्या माजलगाव तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी येथे आजपासून पवित्र अधिक मास यात्रेला प्रारंभ होत असून, यात्रेसाठी प्रशासनाने व्यापक तयारी पूर्ण केली आहे. आज सकाळी ९ वाजता जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते मंदिराची मुख्य महापूजा पार पडणार आहे.

अधिक मासानिमित्त राज्यासह देश-विदेशातून लाखो भाविक पुरुषोत्तमपुरीत दाखल होणार असल्याने दर्शन, सुरक्षा, वाहतूक आणि पार्किंग यासाठी प्रशासनाने विशेष नियोजन केले आहे.

### पार्किंगच्या निर्णयात बदल; भाविकांना मोठा दिलासा

● यात्रेपूर्वी प्रशासनाने वाहन पार्किंगची व्यवस्था गावापासून सुमारे चार किलोमीटर अंतरावर करण्याचा निर्णय घेतला होता.

● या निर्णयाला ग्रामस्थ आणि भाविकांकडून तीव्र विरोध झाला होता. त्यामुळे भाविकांची गैरसोय होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत होती. अखेर प्रशासनाने अखेरच्या दिवशी निर्णयात बदल करत मंदिराजवळच सुमारे २५ एकर जागेवर भव्य पार्किंग व्यवस्था उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे भाविकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

### सुरक्षेसाठी कडक पोलिस बंदोबस्त

● अधिक मास यात्रेदरम्यान गर्दीचे नियंत्रण आणि सुरक्षेच्या दृष्टीने प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली आहे. मंदिर परिसरात ५० पुरुष पोलीस कर्मचारी, २० महिला पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. तसेच संपूर्ण परिसरावर नजर ठेवण्यासाठी २० हून अधिक हायटेक सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

**महत्वाचे ठळक मुद्दे**

● अधिक मास यात्रेला आजपासून सुरुवात ● भाविकांसाठी नागमोडी दर्शनरांग व्यवस्था ● सामान्य रांगेतून सुमारे दोन तासांत दर्शन ● २०० रुपयांच्या व्हीआयपी पासद्वारे १५ मिनिटांत दर्शन ● मंदिराजवळ २५ एकरांत पार्किंग व्यवस्था ● ७० पोलिसांसह सीसीटीव्हीद्वारे सुरक्षा व्यवस्था

यात्रेदरम्यान भाविकांना सुलभ दर्शन मिळावे यासाठी नागमोडी पद्धतीची स्वतंत्र दर्शनरांग तयार करण्यात आली आहे. सामान्य रांगेतून साधारण दोन तासांत भगवान पुरुषोत्तमांचे दर्शन होणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

वेळेअभावी लवकर दर्शन घेऊ इच्छिणाऱ्या भाविकांसाठी २०० रुपयांत 'व्हीआयपी पास'ची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. या पासधारकांना अवघ्या १५ मिनिटांत दर्शन मिळणार असून, मंदिर परिसरात स्वतंत्र काउंटरवर पास वितरणाची व्यवस्था करण्यात आली आहे.

### दगडी बांधकाम वेगात; मूर्ती तात्पुरत्या शेडमध्ये :

सध्या भगवान पुरुषोत्तम मंदिराच्या भव्य दगडी जीर्णोद्धाराचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. या कामासाठी शासनाने ५६ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. मुख्य मंदिर परिसरातील काम प्रगतीपथावर असल्याने भगवान पुरुषोत्तमांची मूर्ती तात्पुरत्या पत्र्याच्या शेडमध्ये स्थापित करण्यात आली आहे. भाविकांना याच ठिकाणी दर्शनाची व्यवस्था करण्यात आली आहे. दर सोमवारी यात्रास्थळी मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेऊन अतिरिक्त नियोजनही करण्यात आले आहे.

# चोला मंडल फायनान्सच्या नावाखाली वाहनधारकास धमकी; भर चौकात खंडणी वसुलीचा आरोप

➤ हप्ता भरल्याचा दावा करूनही अज्ञातांकडून दमदाटी; अधिकृत रिकव्हरी एजंट की खंडणीखोर? नागरिकांत चर्चा

**➤ पैठण / प्रतिनिधी :** पैठण शहरात वाहन फायनान्सच्या थकीत हप्त्यांच्या वसुलीच्या नावाखाली काही अज्ञात व्यक्तींनी एका वाहनधारकाला भर रस्त्यात अडवून धमकावल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे संबंधित वाहनधारकाने हप्ता एक दिवस अगोदरच भरल्याचा दावा केल्याने या संपूर्ण प्रकाराबाबत संशय अधिक गडद झाला आहे. या घटनेमुळे फायनान्स कंपन्यांच्या वसुली पद्धतीवर नागरिकांकडून गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

या प्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार, एका वाहनधारकाने चोला मंडल फायनान्स कंपनीकडून वैगनार चारचाकी वाहनावर कर्ज घेतले होते. काही हप्ते थकीत असल्याचे सांगत तीन ते चार अज्ञात व्यक्ती संबंधित वाहन जप्त करण्यासाठी पैठण शहरात आले होते.

भर वर्दळीच्या ठिकाणी त्यांनी वाहन अडवून चालकाजवळ जात स्टेअरिंग खेचत वाहन रस्त्याच्या कडेला नेल्याचे सांगितले जाते. त्यानंतर "आम्ही चोला मंडल फायनान्स कंपनीकडून आलो आहोत. तुमचे हप्ते थकले आहेत. पूर्ण रक्कम भरा, अन्यथा गाडी जमा करा. नाहीतर वाहन उचलून नेऊ, आमचे कोणी काहीही बिघडवू शकत नाही," अशी धमकी दिल्याचा आरोप वाहनधारकाने केला आहे.



दरम्यान, संबंधित वाहनधारकाने आपण एक दिवस अगोदरच हप्ता भरल्याचे सांगितले. तसेच संबंधितांकडे कंपनीचे ओळखपत्र आणि वाहन जप्तीची अधिकृत परवानगी दाखवण्याची मागणी केली. मात्र, त्यांनी कोणताही ओळख पुरावा दाखवण्यास नकार दिल्याचे समोर आले आहे.

भर रस्त्यात सुरू असलेला गोंधळ पाहून परिसरातील नागरिकांची मोठी गर्दी जमली. उपस्थितांनी संबंधितांकडे पुरावे मागितल्यानंतर त्यांनी तेथून पळ काढल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे हे खरोखर अधिकृत रिकव्हरी एजंट होते की बेकायदेशीररित्या खंडणी वसूल करणारे लोक होते, याबाबत संशय व्यक्त केला जात आहे.

या संदर्भात संबंधित फायनान्स कंपनीचे अधिकारी कमलेश आणि वसुली एजंट सोपान तांबे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी याबाबत कोणतीही स्पष्ट माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचे सांगण्यात आले.

**महत्वाचे ठळक मुद्दे**


● भर चौकात वाहन अडवून धमकी दिल्याचा आरोप ● "हप्ते भरा नाहीतर गाडी उचलून नेऊ" अशी दमदाटी ● वाहनधारकाचा हप्ता आधीच भरल्याचा दावा ● संशयितांनी ओळखपत्र दाखवण्यास नकार ● नागरिकांची गर्दी होताच संबंधितांनी काढता पाय घेतला ● फायनान्स कंपनीच्या वसुली प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह

या घटनेनंतर वाहनधारकांचा वैयक्तिक व आर्थिक डेटा बाहेर कसा गेला? कंपनीतील अंतर्गत संगनमतामुळे हे प्रकार घडत आहेत का? असे प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत.

सदर वाहनधारकाने दिलेल्या माहितीनुसार, येत्या दोन ते तीन दिवसांत संबंधित फायनान्स कंपनीविरोधात धमकी, खंडणी आणि जबरदस्तीच्या आरोपांखाली गुन्हा दाखल होण्याची शक्यता आहे.

भर उन्हात, भर चौकात घडलेल्या या कथित वसुली नाट्यामुळे वाहन फायनान्स कंपन्यांच्या रिकव्हरी यंत्रणेबाबत नागरिकांमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## महा जम्बो शब्दकोडे



### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दुःख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंतःकरण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - **
अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंतःकरण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | | धु | | टो | क | दा | र |
| सा | ग | र | | म | | स | ई | प | रां | ज | पे | | दा | स |
| | न | | द | | वा | र | स | | डे | रा | | लू | | वं |
| अ | म | री | श | पु | री | | | म | | सं | क | ट | | ती |
| ना | त | | र | त | | चौ | क | शी | | ध | | मा | घ | |
| थ | | र | थ | | मा | का | | द | र | | खा | र | | क |
| | मो | द | | क | ल | र | व | | वा | ट | प | | त | म |
| मे | ह | न | त | | व | | जी | व | न | | र | ख | वा | ला |
| ह | र | | | क | ण | ख | र | | गी | त | | रू | | |
| बू | | स | व | ड | | प | | उ | | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | | रा | | उ | दा | ह | र | ण | | श | र |
| | त्न | | रा | ज | धा | नी | | स | ल | | जी | व | | बे |
| न | मा | ज | | न्म | | ल | ग्न | | का | | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | | ना | म | | भी | | अ | | पा | | |
| ली | | त | ग | म | ग | | स | म | ज | दा | र | | शो | ध |

विशेष




## ऑनलाईन फूड डिलिव्हरीचा धक्कादायक प्रकार; एक्स्पायर मटकी पोहोचल्याने संताप

अकोला : ऑनलाईन फूड डिलिव्हरीच्या वाढत्या वापरामुळे ग्राहकांना घरबसल्या सुविधा मिळत असल्या, तरी याच सेवांच्या माध्यमातून ग्राहकांच्या आरोग्याशी गंभीर खेळ सुरू असल्याचे धक्कादायक वास्तव अकोल्यात समोर आले आहे. राज्यभरात सध्या कलिंगडातून विषबाधेच्या घटनांची चर्चा सुरू असतानाच, एका नामांकित ऑनलाईन डिलिव्हरी कंपनीकडून ग्राहकाला थेट एक्स्पायर झालेला खाद्यपदार्थ पाठवण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेमुळे ऑनलाईन फूड डिलिव्हरी कंपन्यांच्या कार्यपद्धतीवर आणि त्यांच्या विश्वासार्हतेवर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

नेमकं काय घडलं? वंचित बहुजन महिला आघाडीच्या प्रदेश महासचिव अरुंधती शिरसाट यांनी ब्लिंकिट या ऑनलाईन प्लॅटफॉर्मवरून २०० ग्रॅम मटकी स्प्राऊट्सचे पाकीट ऑर्डर केले होते. डिलिव्हरी मिळाल्यानंतर त्यांनी पार्सल उघडताच त्यातून तीव्र दुर्गंधी येत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. संशय आल्याने त्यांनी तत्काळ पाकिटावरील माहिती तपासली. त्यावेळी त्या मटकीच्या पाकिटावर नमूद केलेली एक्सपायरी डेट पाहून त्यांना धक्काच बसला.

सदर मटकी स्प्राऊट्सची एक्सपायरी डेट १२ एप्रिल २०२६ अशी होती. म्हणजेच मुदत संपून गेलेला खाद्यपदार्थ ग्राहकाला थेट विकण्यात आल्याचे स्पष्ट झाले. विशेष म्हणजे हा प्रकार अत्यंत निष्काळजीपणाचा असून, अशा अन्नपदार्थांमुळे ग्राहकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो.

कंपनीकडून जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न? हा प्रकार समोर आल्यानंतर अरुंधती शिरसाट यांनी तातडीने संबंधित ऑनलाईन डिलिव्हरी कंपनीशी संपर्क साधला. मात्र, एवढ्या गंभीर प्रकाराबद्दल दिलगिरी व्यक्त करण्याऐवजी किंवा दोषींवर कारवाईचे आश्वासन देण्याऐवजी कंपनीकडून केवळ रिफंड देण्याची भूमिका घेतल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

ग्राहकांच्या जीवाशी संबंधित इतक्या गंभीर प्रकरणात फक्त पैसे परत करून जबाबदारी संपते का, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. सोशल मीडियावरही या प्रकारावर संताप व्यक्त केला जात असून, ऑनलाईन कंपन्यांच्या बेफिकीरीवर नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

अन्न व औषध प्रशासन मौनात?

या प्रकरणी अकोल्याचे अन्न व औषध प्रशासन सहाय्यक आयुक्त देवानंद वीर यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नसल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे अशा गंभीर प्रकरणांकडे संबंधित यंत्रणा दुर्लक्ष करत आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. शहरात मोठ्या प्रमाणावर ऑनलाईन प्लॅटफॉर्मद्वारे खाद्यपदार्थांची विक्री केली जात असताना, त्यांच्या गुणवत्ता तपासणीवर नेमके कोणाचे नियंत्रण आहे, असा सवालही आता नागरिकांकडून विचारला जात आहे. विशेषत: उन्हाळ्याच्या दिवसांत खराब, कुजलेले किंवा बुरशी लागलेले अन्नपदार्थ खाल्ल्यास विषबाधा किंवा इतर गंभीर आजार होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी अरुंधती शिरसाट यांनी अन्न व औषध प्रशासनाकडे केली आहे. तसेच ऑनलाईन खाद्यपदार्थ मागवताना ग्राहकांनीही अधिक सतर्क राहण्याची गरज असल्याचे या घटनेतून अधोरेखित झाले आहे.

## मुंबईत उघड्यावर कुर्बानी देण्यास बंदी घाला, किरीट सोमय्यांची मागणी

मुंबई : मुंबईत उघड्यावर कुर्बानी देण्यास बंदी घाला, अशी मागणी भाजप नेते किरीट सोमय्या यांनी केली आहे. बीएमसी आणि मुंबई पोलीस यांना निवेदन देऊन किरीट सोमय्या यांनी ही मागणी केली आहे. तसेच हिंदूंना धमकावून मनमानी करण्याचा, कायदा धाब्यावर बसण्याचा प्रयत्न झाला तर कुर्बानी देणाऱ्यांना समजेल अशाच भाषेत उत्तर दिले जाईल, असा सूचक इशाराही किरीट सोमय्या यांनी दिला आहे. महापालिका प्रशासनाने सार्वजनिक ठिकाणी कुर्बानी देण्यासंदर्भात मार्गदर्शत तत्वे निश्चित केली आहेत. पण वारंवार या मार्गदर्शत तत्वांचे उल्लंघन होते. अनेक जण सोसायटीच्या अथवा, चाळीच्या आवारात उघड्यावरच कुर्बानी देतात. या प्रकारांना आळा घालण्यासाठी कडक नियम करून त्यांची कठोर अंमलबजावणी करण्याची मागणी किरीट सोमय्या यांनी केली आहे. याआधी सोमय्यांच्या मागणीची दखल घेऊन मुंबई महापालिका प्रशासनाने कुर्बानी संदर्भात काही मार्गदर्शत तत्वे प्रसिद्ध केली. पण या मार्गदर्शक तत्वांचे अनेकदा उल्लंघन होत असल्यामुळे सोमय्यांनी कडक नियम करून त्यांची कठोर अंमलबजावणी करण्याची मागणी केली आहे. काही दिवसांपूर्वी किरीट सोमय्या यांनी बांगलादेशी आणि रोहिंग्या घुसखोरांना मुंबईतून हाकलून देण्यासाठी अनधिकृत फेरीवाल्यांविरोधात कठोर कारवाईची मागणी केली होती.

## जायकवाडीचा पाणीप्रश्न पुन्हा पेटला; शेतकऱ्यांनी घेतली जिल्हाधिकाऱ्यांची भेट, आंदोलनाची दिली हाक

● पान १ वरून ... समन्वयक देविदास चव्हाण, संतोष भारती, बाबुराव जेठे मामा, अप्पासाहेब महानोर, शामराव घुगे, भरत पवार, राहुल लोंढे, संजय जाधव, उमेश मस्के, दिगंबर भाऊ येवले, शेख वहाब, गणेश प्रभाळे, भिकू घोंगडे, हनुमंत गायकवाड, दिनेश गुळवे आदी उपस्थित होते.

यावेळी शेतकर्यांनी

कोकणातील १६८ टीएमसी पाणी नदीजोड प्रकल्पातून मराठवाड्याला मिळणार आहे. हे काम नियोजित वेळेत गतीने करून हे पाणी जायकवाडी धरणातून बीड जिल्ह्यातील शेतीला मिळावे, गोदावरी-सिंदफणा नदीजोड प्रकल्प व उपकालवा यासाठी तातडीने सर्वे करावा, कोकणातून येणार्या १६८ टीएमसी पाण्यात बीड जिल्ह्यातील शेतीला किती पाणी मिळेल हे सांडून त्याचा प्रोजेक्ट रिपोर्ट तात्काळ तयार करावा, गेवराई तालुक्यातून जाणारा उजवा कालवा व माजलगाव धरण यांचे जायकवाडी धरणातून मिळणारे पाणी कमी केले आहे ते पूर्ववत करावे, बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना गतवर्षीचा पीकविमा द्यावा, शेतकऱ्यांना सरसकट व संपूर्ण कर्जमाफी तात्काळ द्यावी आदी मागण्या जिल्हाधिकारी यांना केल्या. या मागण्यांसाठी २९ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर बैलगाडी मोर्चा काढण्याचा इशाराही दिला.

उजव्या कालव्यातून पाणी सोडावे

जायकवाडी धरणाचा उजवा कालवा हा गेवराई व माजलगाव तालुक्यातून जातो. या भागातील शेतकर्यांनी ऊस, फळबाग व भाजीपाला पीक घेतले आहे. सध्या उन्हाळा असल्याने शेतीला पाणी कमी पडू लागले आहे. त्यामुळे उजव्या कालव्यातून सतत पाणी सोडावे अशी मागणीही यावेळी शेतकऱ्यांनी केली.







# कन्नड शहरात 70 सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित; सुरक्षेला नवे बळ

### शहराला मिळालेल्या सुरक्षा कवच मुळे गुन्हेगारीला आळा बसण्याची शक्यता

कन्नड : विशाल भालेराव

शहरातील कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने शहरात अत्याधुनिक सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे शहरातील हालचालींवर प्रभावी देखरेख ठेवणे शक्य होणार असून, गुन्हेगारीवर नियंत्रण आणण्यास मोठी मदत होणार आहे. या उपक्रमांतर्गत शहरात एकूण ७० सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले असून, त्यासाठी सुसज्ज कंट्रोल रूमची उभारणी करण्यात आली आहे. मंत्री तथा पालकमंत्री संजय शिरसाठ यांच्या हस्ते या कंट्रोल रूमचे उद्घाटन पार पडले.

**पोलीस प्रशासनाची भूमिका**

● पोलीस अधीक्षक विजयकुमार राठोड यांनी सांगितले की, या प्रणालीमुळे गुन्ह्यांचा तपास अधिक जलद आणि अचूक होणार आहे. पोलीस निरीक्षक रघुनाथ सानप यांनीही नमूद केले की, सॉफ्टवेअरच्या सहाय्याने गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवणे आता अधिक प्रभावीपणे शक्य होईल.

**महत्वाचे ठळक मुद्दे**

- कन्नड शहरात 70 सीसीटीव्ही कॅमेरे सुरू
- आमदार निधीतून कंट्रोल रूमची उभारणी
- शहरातील ७ संवेदनशील ठिकाणांवर विशेष नजर
- वाहन नंबर प्लेट ऑटो स्कॅनिंग सुविधा
- चोरी व अपघात तपासात होणार मदत
- ८४ दिवसांपर्यंत फुटेज स्टोरेज
- कॅमेऱ्यात छेडछाड झाल्यास तात्काळ सायरन
- वाहतूक नियमभंगावर कारवाई सुलभ

### आमदार संजना जाधव यांचे योगदान

कन्नड शहराच्या विकासासाठी आमदार संजना जाधव यांनी सातत्याने पुढाकार घेतला असून, या सीसीटीव्ही प्रकल्पासाठीही त्यांनी विशेष प्रयत्न केले. शहरातील वाढत्या गरजा लक्षात घेऊन आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांच्या सुरक्षेसाठी त्यांनी हा उपक्रम राबवला आहे. "या यंत्रणेमुळे गुन्हेगारीवर नियंत्रण येईल आणि नागरिकांना सुरक्षित वातावरण मिळेल," असा विश्वास संजना जाधव यांनी व्यक्त केला.

## तलावातील चप्पू पलटल्याने दोन चिमुकलींचा दुर्दैवी मृत्यू

### हिंगणी येथील सरस्वती तलावातील दुर्घटनेने परिसरात शोककळा

माजलगाव : प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील हिंगणी येथील सरस्वती तलावात चप्पू पलटल्याने दोन मुलींचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना शनिवारी (दि. १६ मे) दुपारी घडली. या घटनेमुळे हिंगणी परिसरात शोककळा पसरली असून नागरिकांकडून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

**महत्वाचे ठळक मुद्दे**

● धारूर तालुक्यातील हिंगणी येथे दुर्दैवी घटना ● चप्पू पलटल्याने तीन मुली पाण्यात पडल्या ● दोन मुलींचा उपचारादरम्यान मृत्यू ● एका महिलेची प्रकृती चिंताजनक, तर एक मुलगी उपचारानंतर धोक्याबाहेर ● मासेमारी करणाऱ्या दाम्पत्याने जीवाची पर्वा न करता बचावकार्य केले

मिळालेल्या माहितीनुसार, जोडहिंगणी (ता. धारूर) येथील मासेमारी व्यवसाय करणाऱ्या पारवे कुटुंबातील महिला व काही मुली शनिवारी सकाळी ११ ते १२ वाजण्याच्या सुमारास हिंगणी येथील सरस्वती तलावावर गेल्या होत्या. यावेळी तीन मुली चप्पूवर बसून तलावात फिरत असताना अचानक चप्पूचा तोल जाऊन तो पलटी झाला. त्यामुळे पलक पारवे, दिव्या कांबळे आणि मोहिनी पारवे या तिघी पाण्यात पडल्या.

तलावाच्या काठाजवळ असलेल्या जान्हवी कोंडीराम पारवे (वय १०), तन्वी कोंडीराम पारवे (वय ८), माधवी शाम पारवे (वय १७) आणि माया मालाजी शिंदे (वय ३०) यांनी आरडाओरड केली. त्यानंतर जवळच मासेमारी करत असलेले धनराज पारवे व त्यांची पत्नी बिटुबाई पारवे





यांनी तात्काळ तलावात उडी घेत बचावकार्य सुरू केले. या घटनेत पलक शाम पारवे (वय १४, रा. हिंगणी), दिव्या विकास कांबळे (वय ९, रा. कासारवाडी), मोहिनी भीमा पारवे (वय १६) तसेच त्यांना वाचवण्यासाठी पाण्यात उतरलेल्या माया मालाजी शिंदे यांना बेशुद्ध अवस्थेत बाहेर काढण्यात आले. त्यांना प्रथम मोहखेड प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी अंबाजोगाई येथील स्वाराती रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र उपचारापूर्वीच पलक पारवे आणि दिव्या कांबळे यांचा मृत्यू झाला. माया मालाजी शिंदे यांची प्रकृती चिंताजनक असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. तर मोहिनी पारवे हिला दिंद्रुड येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून तिची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळाली आहे. दरम्यान, मृत पलक पारवे व दिव्या कांबळे यांच्या पार्थिवांवर अंबाजोगाई येथे शवविच्छेदन करण्यात आले. त्यानंतर हिंगणी व कासारवाडी येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

## शाही इमाम मौलाना उस्मान लुधियानवी यांचे चिखली येथे मार्गदर्शन

### शिक्षण, राष्ट्रप्रेम व हिंदू-मुस्लिम एकोप्याचा संदेशासाठी शेर ए पंजाब चिखलीत येणार | सर्व धर्मीय बांधवांनी उपस्थित रहावे - मुफ्ती शफिक साहेब मिल्ली

आष्टी / प्रतिनिधी :

मायनॉरीटी सोशल डेव्हलपमेंट बोर्ड अंतर्गत कार्यरत असलेली जामीया अबुल हसन, चिखली (ता. आष्टी) ही संस्था सन २०२२ पासून शैक्षणिक, धार्मिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत आहे. या संस्थेत विद्यार्थी उर्दू व अरबी शिक्षणासोबतच संगणक शास्त्र तसेच शालेय शिक्षणही देत असून विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये, संस्कार व देशभक्तीची भावना रुजविण्याचे कार्य सातत्याने केले जात आहे.

संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना इस्लामी शिक्षणासोबत आधुनिक शिक्षणाची जोड दिली जात असून आतापर्यंत संस्थेने ५ हाफीज तयार केले आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी संस्था प्रयत्नशील असून अल्पसंख्याक समाजात शिक्षणाची जागृती निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य येथे केले जात आहे.

यंदा संस्थेचे चौथे वर्ष सुरू होत असून या निमित्ताने मंगळवार, दि. १९ मे रोजी शाही इमाम शेर-ए-पंजाब मौलाना उस्मान साहब लुधियानवी हे जामीया अबुल हसन, चिखली येथे भेट देणार आहेत. यावेळी ते उपस्थितांना शिक्षण, सामाजिक ऐक्य, राष्ट्रप्रेम व समाजातील एकोप्याबाबत मार्गदर्शन करणार आहेत.

या कार्यक्रमास परिसरातील





नागरिक, विद्यार्थी, पालक तसेच सर्व धर्मीय बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली आहे. कार्यक्रमाच्या माध्यमातून हिंदू-मुस्लिम ऐक्याचा संदेश देणार आहेत. या प्रसंगी सर्व हिंदू-मुस्लिम बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

### पंजाबचे शाही इमाम मौलाना मुहम्मद उस्मान रहमानी लुधियानवी यांची समाजोपयोगी कार्ये

● पंजाबचे शाही इमाम मौलाना मुहम्मद उस्मान रहमानी लुधियानवी हे धार्मिक कार्यासह अनेकविध सामाजिक उपक्रमांमध्ये अग्रेसर आहेत. पंजाबमधील पूरग्रस्तांना मदत, मोफत रुग्णवाहिका सेवा, व्यसनमुक्ती मोहिमा आणि महिला सुरक्षेसाठी तरुण पिढीत जनजागृती यांसारख्या समाजोपयोगी कार्यांमध्ये त्यांचे मोठे योगदान आहे.

● पूरग्रस्तांना मदत : पंजाबमध्ये आलेल्या भीषण पुराच्या काळात त्यांनी 'अहरार फाऊंडेशन'च्या माध्यमातून पूरग्रस्त भागात अन्न, औषधे आणि इतर आवश्यक वस्तूंचे वाटप केले. मोफत रुग्णवाहिका सेवा गरजूंसाठी त्यांनी जामा मशीद लुधियाना येथून मोफत रुग्णवाहिका सेवेची (Free Ambulance Service) सुरुवात केली आहे. व्यसनमुक्ती आणि युवा जनजागृती पंजाबमधील वाढत्या व्यसनाधीनतेवर चिंता व्यक्त करत, त्यांनी तरुणांना व्यसनापासून दूर राहण्यासाठी आणि योग्य मार्गदर्शन मिळवून देण्यासाठी विशेष मोहीम राबवली आहे.

● महिला सक्षमीकरण आणि सुरक्षा महिलांवरील अत्याचार आणि कौटुंबिक हिंसाचाराविरुद्ध समाजाने आवाज उठवला पाहिजे, यासाठी ते शाळा आणि महाविद्यालयांमधील तरुण-तरुणींमध्ये मानवाधिकार आणि सहिष्णुतेविषयी जागृती निर्माण करत आहेत. धार्मिक सलोखा देशात धर्माच्या नावावर पसरणाऱ्या द्वेषाला विरोध करत, त्यांनी सर्वसमावेशकतेचा संदेश दिला जात आहे.

## पुण्यात पोलिसांवर गोळीबार करत आरोपी फरार

पुणे : पुण्यात पोलीस आणि गुन्हेगारांमध्ये पाठलाग झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. एखाद्या ॲक्शन चित्रपटालाही लाजवेल असा हा प्रकार पुणे जिल्ह्यात घडला असून आरोपींनी पोलिसांच्या दिशेने हवेत गोळीबार करत घटनास्थळावरून पळ काढल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर पुणे ग्रामीण पोलीस आणि पिंपरी-चिंचवड पोलिसांनी आरोपींच्या शोधासाठी मोठी मोहीम हाती घेतली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चऱ्होली गोळीबार प्रकरणातील फरार आरोपींना पकडण्यासाठी पोलिसांनी रांजणगाव परिसरातील पिंपरी दुमाला गावात सापळा रचला होता. आरोपी या परिसरात येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस पथक घटनास्थळी दबा धरून बसले होते. मात्र पोलिसांची चाहूल लागताच आरोपींनी दुचाकीवरून तिथून पळ काढण्याचा प्रयत्न केला. यानंतर पोलिसांनी तात्काळ त्यांचा पाठलाग सुरू केला. या पाठलागादरम्यान काही अंतरावर पोलिसांच्या वाहनाने आरोपींच्या दुचाकीला धडक दिली.

**भाजपा नेते बाळराजे पवार यांच्या प्रयत्नांना मोठे यश** | कामगारांनी आनंदोत्सव साजरा करून पवारांचे मानले आभार

## गेवराई नगर परिषदेचे कंत्राटी कामगारांना किमान वेतन लागू

गेवराई / प्रतिनिधी :

शहराच्या सर्वांगीण विकासात पाणी आणि स्वच्छता हे महत्वाचे घटक असून, कंत्राटी सफाई कामगार शहरातील स्वच्छतेचा कणा आहे. त्यांच्यामुळेच शहरातील घाण साफ होते. सगळेच कामगार इमानेइतबारे काम करून, शहरातील नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेत आहेत. म्हणूनच, किमान वेतन अधिनियमानुसार त्यांना पगार देण्याचा निर्णय घेतला. आम्ही कामगारांवर उपकार केले नाहीत. गोरगरीब कामगारांच्या सुखदु:खात आम्ही कायम सोबत आहोत. तुम्ही प्रमाणीकपणे काम करा, तुमच्यावर कधीच अन्याय होऊ देणार नाही. अशी भावना भारतीय जनता पक्षाचे नेते बाळराजे पवार यांनी येथे बोलताना व्यक्त केली आहे. दरम्यान, भारतीय जनता पक्षाच्या ताब्यात गेवराई नगर परिषदेची सत्ता येताच निवडणुकीत दिलेला शब्द बाळराजे पवार यांनी पाळल्याने, कामगारांनी पेढे वाटून आनंद व्यक्त करून, त्यांचे आभार



मानले आहेत.

गेवराई नगर परिषदेच्या कंत्राटी कामगारांच्या वतीने, शनिवार ता. १६ मे रोजी सकाळी अकरा वाजता भारतीय जनता पक्ष कार्यालयात आयोजित सत्कार समारंभात ते बोलत होते. व्यासपीठावर नप उपाध्यक्ष ॲड. घुंबार्डे जिजा, गटनेते ॲड राजेंद्र राक्षसभूवनकर, माजी सरपंच दिलीप मोरे मामा, सभापती महेश सौंदरमल, सभापती बद्दुशेठ, नगरसेवक अप्पासाहेब कानगुडे, नगरसेवक राजेश टाक, माजी सभापती जिजा खंडागळे, माजी नगराध्यक्ष सुशील जवंजाळ, माजी नगरसेवक भरत गायकवाड यांची उपस्थिती होती.

गेवराई नगर परिषदेच्या कंत्राटी कामगारांना किमान वेतन अधिनियमानुसार पगार देऊ, असा शब्द भारतीय जनता पक्षाच्या नेते बाळराजे पवार यांनी नप च्या निवडणुकीत जाहीर सभेतून दिला होता. नगर परिषदेवर सत्ता स्थापन होताच, पवार यांनी कामगारांना दिलेला शब्द पाळला असून, कामगारांना किमान वेतन देण्यात आले आहे. नपच्या कंत्राटी कामगारांना किमान वेतन दिले जात आहे. कामगारांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे.

कामगारांच्या वतीने शनिवार ता. १६ रोजी बाळराजे पवार यांचा जाहीर सत्कार करून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. महिला कामगारांनी पवारांचे शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. पाणी पुरवठा, घंटा गाडी, स्वच्छता विभागाच्याकामगारांनी पवार यांचे स्वागत करून आनंद व्यक्त केला.

यावेळी बोलताना पवार म्हणाले की, गेवराई चे कामगार शहराचे भूमिपुत्र आहेत. त्यांच्याच बळावर शहरातील स्वच्छता मोहीम यशस्वी होऊ शकली. ते इमानदारी काम करत आलेत. त्यामुळे त्यांच्या घामाचा मोबदला म्हणून त्यांच्यासाठी किमान वेतनाचा विषय मार्गी लावला आहे. कामगारांच्या हक्कासाठी किमान वेतन देणारी, गेवराई नगर परिषद ही, मराठवाड्यातली पहिली नगरपालिका ठरली आहे. ही बाब मनाला खूप समाधान देणारी आहे. पाणी आणि स्वच्छता हे महत्वाचे विषय आहेत. कामगार हा स्वच्छता दूत असून, ते शहरातील स्वच्छतेचा कणा आहेत. त्यांच्यामुळेच शहरातील घाण साफ होते. सगळे कामगार इमानेइतबारे काम करून, शहरातील नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेत आहेत. याचा आनंद असून, त यापुढे ही, त्यांचे हित लक्षात घेऊन नपचे नगराध्यक्ष, नगरसेवक काम करतील.

तुम्ही कुठेही कमी पडू नका, आम्ही तुमच्या पाठीशी आहोत. अशी अपेक्षा भाजपा नेते बाळराजे पवार यांनी शेवटी बोलताना व्यक्त केली. यावेळी ॲड. राजेंद्र राक्षसभुवनकर, महेश सौंदरमल यांची भाषणे झाली. यावेळी मुन्ना शेठ, विष्णुपंत आतकरे, भरतजी गायकवाड, कृष्णा भैया पाटोळे, आखेब काझी, फाहाद चाऊस, जावेद पठाण, शौकत पठाण संतोष राठोड, राजू पठाण, राम चोरमले, गणेश सुरडकर संजय आंधळे, श्रीराम घाटूळ, मुजायद टेलर, उमेश साकळे, लक्ष्मण चव्हाण, यांच्यासह नगर परिषदेचे कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार सुभाष सुतार यांनी केले. आभार माजी नगरसेवक भरत गायकवाड यांनी मानले.